# मावळा गीताद्वारेइंडियाआशा फौंडेशनचा 'हर घर तिरंगा' अभियानात सहभाग

**पुणे :** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येत आहे. इंडियाआशा फौंडेशनतर्फे या अभियानात वेगळ्याप्रकारे सहभागी होण्यासाठी एक देशभक्तीपर गीत तयार करण्यात आले आहे - मी एक निनावी मावळा . दि. १३ ऑगस्ट रोजी हे गीत प्रसारितकरण्यात येणार आहे.हर घर तिरंगा अभियानांतर्गत एक आठवड्यात दहा दशलक्ष नागरिकांनी हे गीत ऐकावे/पहावे असे उद्दिष्ट संस्थेने डोळ्यासमोर ठेवले आहे. त्यासाठी प्रत्येक भारतीयाने आपले कुटुंबीय, नातेवाईक व परिचित अशा किमान १० सदस्यांपर्यंत मावळा गीत पोहचवावे असे आवाहन इंडियाआशा फौंडेशनतर्फे करण्यात येत आहे.

देशसेवेचा वसा स्वीकारून निष्ठेने भारतीय जवान आपल्या प्राणांची पर्वा न करता अहोरात्र कष्ट करतात. थंडी, ऊन, पाऊस व इतर अनेक अडचणींचा सामना करत रात्रंदिन शत्रूशी दोन हात करत असतात. आपलं कुटुंब, गाव असा संकुचित विचार न करता मातृभूमीची सेवा करत भारताचे स्वातंत्र्य, सुरक्षा व स्थैर्य अबाधित राखण्यासाठी झटत असतात. दरवर्षी स्थल, वायू व नौसेनेत भरती होण्यासाठी लाखो तरुण प्रेरित होतात. मातृभूमीच्या रक्षणाचे बाळकडू त्यांना आपल्या कुटुंबियांकडून, गावातील लोकांकडून व मातीतूनच मिळते. प्रत्येक भारतीयासाठी आदर्श व जीवनातले खरे ' हिरो ' घडवण्यात अनेकांचे हातभार लागतात. देशाच्या कानाकोपऱ्यातील गावातून आलेले हे अनोळखी ' हिरो ' सैन्यात भरती होतात.